**“जुलै २०१८” या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

**(क) शासन निर्णय / अधिसूचना**

- दिनांक २ जुलै २०१८ च्या शासन निर्णयान्वये भूतपूर्व दुय्यम सेवा निवडमंडळाच्या कक्षेतील नामनिर्देशनाच्या कोटयातील गट-क व गट-ब (अराजपत्रित) संवर्गातील रिक्त पदभरतीकरिता धडक कालबद्ध कार्यक्रम २०१८ निश्चित करण्यात आला आहे.
- दिनांक ३ जुलै २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये, संगणक हाताळणी / वापराबाबतचे ज्ञान याबाबतचे विहित प्रमाणपत्र सादर न केल्यास वेतनवाढ रोखणे / पदोन्नती रोखण यासारख्या करावयाच्या कार्यवाहीसंदर्भात, महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी / वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) (सुधारणा) नियम, २०१८ मधील तरतुदी विचारात घेण्याची दक्षता सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी घ्यावी असे निदेश दिले आहेत.
- दिनांक ४ जुलै २०१८ च्या शासन ज्ञापनान्वये लिपिक-टंकलेखक (मराठी / इंग्रजी) परीक्षा २०१७ अंतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या अनुक्रमे ४५५ (मराठी) व ३७ (इंग्रजी) अशा ४९२ उमेदवारांचे मंत्रालयीन विभाग व बृहन्मुंबईतील राज्य शासनाच्या विविध कार्यालयातील रिक्त पदावर नियतवाटप करण्यात आले आहे.
- दिनांक ११ जुलै २०१८ च्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार योजनेच्या अंमलबजावणीसाठी अर्थसंकल्पिय तरतूदी करिता नवीन लेखाशीर्ष उघडण्यात आले आहे.
- दिनांक १७ जुलै २०१८ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील आहार / उपाहारगृहांतील कर्मचारी गणवेश धुलाईकरिता मे.मयकु प्रसाद लॉण्ड्री, रिकामे डब्बे, रिकामे गोणी इत्यादींची विक्रीकरिता मे.सहारा स्क्रॅप हाऊस तसेच गॅस शेगडी / बर्नर, गॅस पाईप लाईन यांच्या दुरुस्तीसाठी मे.सुभाष यादव सहारा स्क्रॅप हाऊस या निविदकारांच्या दिनांक १ जुलै २०१८ ते ३० जून २०१९ या कालावधीकरिता निविदा स्वीकृत केल्या आहेत.
- दिनांक २४ जुलै २०१८ च्या शासन निर्णयान्वये मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर), पैठण, जिल्हा-औरंगाबाद या संस्थेस विकास प्रशिक्षण व तद्नुषंगिक खर्च तसेच अधिकारी व कर्मचारी यांच्या अनिवार्य (वेतन) खर्चासाठी एकूण अर्थसंकल्पिय अनुदानाच्या ७०% मर्यादेत अर्थसंकल्पिय प्रणालीवर उपलब्ध असलेल्या सहायक अनुदानातून रु.३०.०० लाख इतके अनिवार्य सहायक अनुदान (दुसरा हप्ता) मंजूर करण्यात आला आहे.
- दिनांक २४ जुलै २०१८ च्या शासन निर्णयान्वये राज्य प्रशिक्षण धोरणान्वये प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याकरिता घोषित करण्यात आलेल्या जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, जव्हार पालघर, ठाणे / जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, संगमनेर, अहमदनगर / आरोग्य आणि कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, नागपूर या ३ जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था म्हणनू दर्जा रद्द करण्यात आला आहे. तसेच जिल्हा मुख्यालयाच्या स्तरावर ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, कोसबाड हिल, ता.डहाणू, पालघर / जिल्हा शैक्षणिक सातत्यूपर्ण व्यावसायिक विकास संस्था, नागपूर / अहमदनगर जिल्हा प्रशिक्षण प्रबोधिनी, अहमदनगर / महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण आणि संशोधन संस्था (मीत्रा), नाशिक या ४ जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत.
- दिनांक २५ जुलै २०१८ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील अवर सचिव (विधि) हे पद उपसचिव (विधि) या संवर्गात श्रेणीवर्धित करण्यात आले आहे.
- दिनांक २७ जुलै २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालय नियंत्रण कक्षामध्ये मंत्रालयीन विभागातून नियुक्ती करावयाच्या अधिकारी / कर्मचारी यांच्या रचनेमध्ये बदल करण्यात आला आहे. त्यानुसार मंत्रालयीन विभागांच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या संख्येच्या मर्यादेत प्रत्येक महिन्यातील किमान एका सत्राकरिता मंत्रालयीन नियंत्रण कक्षासाठी अधिकारी /

कर्मचारी उपलब्ध करुन देण्याच्या दिवस वाटपामध्ये दुरुस्ती करुन नव्याने निर्माण करण्यात आलेल्या विभागांनाही दिवसाचे वाटप करण्याचे ठरविण्यात आले आहे.

- दिनांक २३ जुलै २०१८ च्या शासन पत्रान्वये गट-क व गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या विभागीय चौकशीसाठी कंत्राटी तत्त्वावर नियुक्तीसाठी इच्छुक सेवानिवृत्त चौकशी अधिकाऱ्यांची सामायिक यादी (पॅनल) प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक ३० जुलै २०१८ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम सीपीटीपी-४ अंतर्गत मंत्रालयीन कक्ष अधिकारी गट-ब संवर्गामध्ये सामान्य प्रशासन विभागाच्या आस्थापनेवर दिनांक २९ जुलै २०१७ ते ३१ जुलै २०१९ या कालावधीसाठी निर्माण करण्यात आलेल्या ३२ अधिसंख्य पदांपैकी १५ अधिसंख्य पदे रद्द करण्यात आली आहेत.
- दिनांक ३१ जुलै २०१८ च्या शासन आदेशान्वये श्री.प्रसेनजित ज्ञानेश कार्लेकर, प्रशिक्षणार्थी कक्ष अधिकारी (गट-ब) यांचा परिविक्षाधीन कालावधी एक वर्षासाठी वाढवून देण्यात आला आहे.
- दिनांक ३० जुलै २०१८ च्या शासन निर्णयान्वये गट-अ संवर्गातील निवडक १२ सेवांमधील शासकीय अधिकाऱ्यांचे सन २०१६-१७ चे कार्यमुल्यमापन अहवाल महापार प्रणालीत असतील त्या टप्प्यावर दिनांक ८ ऑगस्ट २०१८ रोजी बंद करण्यात आले आहेत. त्या अहवालासंदर्भात आता कोणतीही कार्यवाही करता येणार नाही. सदर कार्यमुल्यमापन अहवाल आहेत त्या स्थितीत अंतिम राहतील.

**(ख) <u>बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल</u>**

- भारतीय प्रशासन सेवेतील ६ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- अवर सचिव-१, कक्ष अधिकारी-१ अशा २ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- कक्ष अधिकारी-२, सहायक कक्ष अधिकारी-३, लिपिक टंकलेखक-२ अशा ७ अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या बदल्या रद्द करण्यात आल्या आहेत.
- सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील ४ कर्मचाऱ्यांच्या बदलीस मुदतवाढ देण्यात आली आहे.
- सहसचिव-६, अवर सचिव-४, कक्ष अधिकारी-८, सहायक कक्ष अधिकारी-११, वरिष्ठ स्वीय सहायक-१, उच्चश्रेणी लघुलेखक-६, निम्नश्रेणी लघुलेखक-५, लिपिक टंकलेखक-१० अशा ५१ अधिकारी / कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करण्यात आले आहे.

**<u>(ग) पदोन्नती / प्रपत्र बढती व मुदतवाढ / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक</u>**

- एका अवर सचिवाच्या प्रपत्र बढतीस मुदतवाढ देण्यात आली आहे.
- उपसचिव-१, कक्ष अधिकारी-१ अशा २ अधिकाऱ्यांना पदोन्नतीचा नियमित दिनांक देण्यात आला आहे.

**(घ) <u>प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन</u>**

- २ कक्ष अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्ती देण्यात आली आहे.
- उपसचिव-१, अवर सचिव-१, कक्ष अधिकारी-१, उच्चश्रेणी लघुलेखक-१ अशा ४ अधिकारी / कर्मचाऱ्यांचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.
- अवर सचिव-१, कक्ष अधिकारी-१ अशा २ अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(च) <u>प्रशिक्षण / परीक्षा</u>**

- दिनांक ४ जुलै २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये सहायक कक्ष अधिकारी यांच्या कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी सन २०१८ मध्ये घ्यावयाच्या विभागीय परीक्षेच्या प्रशिक्षण आणि परीक्षेसाठीचा अर्ज दिनांक ४ ऑगस्ट २०१८ पर्यंत पाठविण्याच्या सूचना दिल्या आहेत.

- दिनांक ४ जुलै २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये “सहायक कक्ष अधिकारी सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा २०१८” या परीक्षेला पुन्हा बसू इच्छित असलेल्या (Repeater) उमेदवारांचे अर्ज दिनांक २४ जुलै २०१८ पर्यंत पाठविण्याच्या सूचना दिल्या आहेत.

***********